**भारत सरकार**
**अणुऊर्जा विभाग**

**अणुशक्ती भवन,**
**सीएसएम मार्ग,**
**मुंबई – 400001.**

जाहिरात क्रमांक 1/2022
**कुलगुरू**
होमी भाभा राष्ट्रीय संस्था, मुंबई
या पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

---

अणुऊर्जा विभाग (अऊवि), होमी भाभा राष्ट्रीय संस्था (एचबीएनआई) येथे कुलगुरू या पदावर नियुक्तीसाठी एका प्रतिष्ठित वैज्ञानिक/अभियंत्याची आवश्यकता आहे. एचबीएनआय ही अऊविची अनुदानीत संस्था आहे व UGC कायद्याच्या कलम 3 अंतर्गत डीम्ड युनिव्हर्सिटी आहे. एचबीएनआय हे गणितासह अणुविज्ञान आणि अभियांत्रिकी या विषयात प्रविण असलेले आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संशोधन विद्यापीठ आहे. शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करण्याच्या उद्देशाने, एचबीएनआयच्या घटक संस्था आणि ऑफ कॅम्पस सेंटर्स खालीलप्रमाणे आहेत.

1. भाभा अणुसंशोधन केंद्र (बीएआरसी), मुंबई
2. इंदिरा गांधी अणुसंशोधन केंद्र (आईजीसीएआर), कल्पक्कम
3. राजा रामण्णा प्रगत तंत्रज्ञान केंद्र (आरआरकॅट), इंदोर
4. परिवर्तनीय ऊर्जा सायक्लोट्रॉन केंद्र (व्हीईसीसी), कोलकाता
5. साहा नाभिकीय भौतिकशास्त्र संस्था (एसआईएनपी), कोलकाता
6. प्लाझ्मा संशोधन संस्था (आईपीआर), गांधीनगर
7. भौतिकशास्त्र संस्था (आईओपी), भुवनेश्वर
8. हरीश-चंद्र संशोधन संस्था (एचआरआई), प्रयागराज (अलाहाबाद)
9. टाटा स्मारक केंद्र (टीएमसी), मुंबई
10. गणित विज्ञान संस्था (आईएमएससी), चेन्नई
11. राष्ट्रीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था (नाइसर), भुवनेश्वर (ओसीसी)

**<u>वेतनश्रेणी:</u>** भारत सरकारच्या नियमांनुसार पदाची वेतन श्रेणी रु 2,25,000/- (स्थिर) अधिक भत्ते आहे.

**<u>पदाचा कार्यकाळ आणि वय:</u>** कुलगुरूंचा कार्यकाळ जास्तीत जास्त पाच वर्षे असेल आणि ते पाच वर्षांपेक्षा अधिक नसलेल्या दुसऱ्या कार्यकाळासाठी पात्र असतील, परंतु कोणत्याही परिस्थितीत ते / त्या वयाच्या 70 वर्षानंतर या पदावर असणार नाहीत. शिवाय, कुलगुरू म्हणून प्रारंभिक नियुक्तीच्या वेळी, उमेदवाराचे वय 65 वर्षांपेक्षा जास्त नसावे. तथापि, विद्यमान कुलगुरूंचा कार्यकाळ वाढविण्याच्या प्रकरणांना हे लागू होणार नाही. वयाच्या हेतूसाठी, संदर्भाची तारीख ही पदभार सांभाळण्याची अपेक्षित तारीख आहे जी 04.10.2022 आहे.

**<u>कार्य स्वरूप</u>:** कुलगुरू हे संस्थेचे प्रमुख कार्यकारी अधिकारी असतील आणि ते मेमोरँडम ऑफ असोसिएशन आणि एचबीएनआयच्या नियमांनुसार संस्थेच्या कारभारावर सामान्य पर्यवेक्षण आणि नियंत्रण ठेवतील. ते/त्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, शैक्षणिक परिषदेचे आणि एचबीएनआयच्या वित्त समितीचे अध्यक्ष असतील.

**<u>शैक्षणिक अर्हता</u>**: उमेदवार हा अभियांत्रिकी किंवा विज्ञान या विषयात प्रथम श्रेणीसह पीएच.डी. असावा आणि पीएचडीपूर्वीच्या पदवीत त्याने प्रथम श्रेणी किंवा तत्सम श्रेणी मिळविलेली असणे अनिवार्य आहे. ते/त्या उत्कृष्ट शैक्षणिक पार्श्वभूमी असलेले प्रख्यात अभियंता/शास्त्रज्ञ/प्राध्यापक असावेत.

**<u>इष्ट पात्रता:</u>** अऊविच्या कामकाजाशी परिचित असणे ही एक इष्ट पात्रता आहे.

**<u>अनुभव:</u>** प्राध्यापक म्हणून अध्यापन आणि संशोधनाचा किमान 15 वर्षांचा अनुभव ज्यापैकी 10 वर्षे वेतनमान लेव्हल-14 आणि त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे किंवा संशोधन प्रयोगशाळेत विज्ञान आणि अभियांत्रिकीमधील संशोधनाचा समतुल्य अनुभव. उमेदवार हा उत्कृष्ट रेकॉर्ड असलेली प्रख्यात व्यक्ती असणे आवश्यक आहे. ज्यांनी अऊविची संशोधन केंद्रे किंवा अनुदानित संस्थांमध्ये किमान 25 वर्षे काम केले आहे, त्यांना प्राधान्य दिले जाईल.

**<u>निवड प्रकिया:</u>** भारत सरकारद्वारे शोध-व-निवड समितीच्या शिफारशीनुसार नियुक्ती केली जाईल. अऊवि द्वारे निवडीच्या उद्देशाने स्थापन केलेली शोध-व-निवड समिती या जाहिरातीला प्रतिसाद म्हणून प्राप्त झालेल्या अर्जांचा तसेच प्रतिष्ठित व्यक्तींकडून प्राप्त झालेल्या नामांकनांचा विचार करेल. शोध-व-निवड समिती योग्य वाटेल तसे इतर कोणत्याही नावाचा विचार करू शकते आणि अशा व्यक्तीकडून अर्ज मागवू शकते.

**<u>अर्ज करण्याची प्रक्रिया</u>:** इच्छुक व्यक्ती विहित नमुन्यात त्यांचा तपशीलवार एक पानी रेझ्युमे देऊन (250 शब्द कमाल) संस्थेसाठीच्या व्हिजन स्टेटमेंटसह अर्ज करू शकतात. एका साध्या कागदावर टाईप केलेला अर्ज नोंदणीकृत पोस्ट/स्पीड पोस्टद्वारे **अवर सचिव, सचिव कार्यालय, अऊवि, अणुशक्ती भवन, सीएसएम मार्ग, मुंबई – 400001** येथे पाठवला जाऊ शकतो. सरकारी विभाग किंवा त्यांच्या अंतर्गत असलेल्या स्वायत्त संस्थांमध्ये कार्यरत असलेल्या व्यक्तींनी त्यांचे अर्ज योग्य चॅनेलद्वारे पाठविले पाहिजेत. विहित नमुना अऊवि वेबसाइट **www.dae.gov.in** आणि/ अथवा एचबीएनआय वेबसाइट **www.hbni.ac.in** वरून डाउनलोड केला जाऊ शकतो. हँड डिलिव्हरी / स्पीड पोस्ट / कुरिअरद्वारे अर्ज प्राप्त करण्याची अंतिम तारीख 20-6-2022 आणि वेळ संध्याकाळी 5 वाजता ही आहे. अर्जाची आगाऊ प्रत chmnoff@dae.gov.in वर ईमेलद्वारे देखील पाठविली जाऊ शकते. तथापि, जेथे लागू असेल तेथे योग्य चॅनेलद्वारे, हँड डिलिव्हरी / स्पीड पोस्ट / कुरिअर द्वारे सर्व बाबतीत पूर्ण अर्ज प्राप्त झाल्याची तारीख आणि वेळ वैध मानली जाईल आणि विहित तारीख आणि वेळेच्या पलीकडे प्राप्त झालेले अर्ज अवैध अर्ज म्हणून मानले जातील.

अर्ज असलेल्या लिफाफ्यावर **"कुलगुरू, एचबीएनआय या पदासाठी अर्ज"** असे लिहिलेले असावे. पारगमनात कोणताही अर्ज हरवल्यास अणुऊर्जा विभाग जबाबदार राहणार नाही.

जे उमेदवार स्क्रीनिंगनंतर पात्र ठरतात त्यांना मुलाखतीसाठी बोलावण्याचा, किंवा मुलाखती शिवाय निवड प्रक्रियेसाठी विचार करण्याचा, किंवा कोणतेही कारण न देता सर्व अर्ज नाकारण्याचा अधिकार अणुऊर्जा विभाग राखून ठेवतो.

कुलगुरू,
होमी भाभा राष्ट्रीय संस्था (HBNI)
या पदासाठी अर्ज

पासपोर्ट आकारचा फोटो

(35x45 मिमी)

| | | |
|---|---|---|
| 1. | अर्जदाराचे नाव | |
| 2. | लिंग | |
| 3. | जन्मतारीख आणि 04-10-2022 रोजी वय | |
| 4 | पत्ता | |
| 5 | दूरध्वनी /मोबाईल क्र. | |
| 6. | ई-मेल | |

7. शैक्षणिक अर्हता : (पदवीधर आणि त्यापुढील)

| क्रमांक | अर्हता | विषय | वर्ष /श्रेणी | संस्था /विद्यापीठ स्थळ / देश |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |

8. पोस्टडॉक्टरल फेलोशिप (असल्यास) :

9. अनुभव

(कृपया आवश्यक असल्यास स्वतंत्र पत्रक जोडा) :

| क्रमांक | पद | संस्था आणि पत्ता | पद आणि ग्रेड पे किंवा वेतनमानासह पे बँड | कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |

10. गेल्या दहा वर्षातील महत्त्वपूर्ण योगदान:

(कृपया स्वतंत्र पत्रक जोडा)

11. शैक्षणिक प्रशासनातील अनुभव आणि कामगिरी विषयी माहिती:

12.फेलोशिप/ व्यावसायिक, शैक्षणिकसदस्यत्व, पुरस्कार आणि इतर सन्मान यांचा तपशील

13. संदर्भ

| क्रमांक | नाव | पद | पत्ता | दूरध्वनी क्र./ई-मेल |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |

14. व्हिजन स्टेटमेंट जोडले आहे : हो /नाही

15. अन्य काही माहिती:

(अर्जदाराची सही)

स्थळ:
दिनांक: